oct 195


# पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड–अलिबाग

टिळकरोड, हिराकोट तलावाशेजारी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
दूरध्वनी क्र. ०२१४१–२२२०२८/२२८४७३, फॅक्स क्र. २१४१–२२८७८९
ई मेल sp. raigad@mahapolice.gov.in


क्र. १७६/आस्था–६/सर्वसाधारण बदल्या–२०१९, अलिबाग, दि. :– 06/03/२०१९

संदर्भ :– १. शासन निर्णय गृहविभाग क्र.टीआरए–११०/प्र.क्र.४८८/पोल–५अ, दिनांक २३ एप्रिल २०१०
२. महाराष्ट्र शासन सन २०१५ चे बदली अध्यादेश क्र. २
३. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र. पोमसं/३अधिसुचना/१४/७३/२०१४, दिनांक २५/०२/२०१५

विषय :– पोलीस कर्मचा–यांच्या सर्वसाधारण बदल्या–२०१९

*******

**परिपत्रक**

वरील शासन निर्णयास व बदली अध्यादेश क्र. २ अन्वये पोलीस शिपाई ते सहा. पोलीस उपनिरीक्षक ( सहा फौजदार ) या संवर्गातील कर्मचा–यांच्या बदल्यांबाबत खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत.

क्र. १. :– राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ( गट क ) या संवर्गातील कर्मचा–यांच्या बदल्यांसाठी खालील प्रमाणे निकष ठरविण्यांत आले आहेत.

अ. या संवर्गातील कर्मचा–यांचा एक पोलीस स्टेशन मधील कालावधी खंडीत/अखंडीत सेवा धरून ०५ वर्षाकरीता राहील.

ब. तालुक्यामध्ये एका पेक्षा जास्त पोलीस स्टेशन असल्यास त्या तालुक्यातील कमाल कालावधी सर्व संवर्गातील खंडीत अथवा अखंडीत सेवा धरून १२ वर्षे राहील.

क. पोलीस आयुक्तालयामध्ये परिमंडळ हे तालुक्याशी समकक्ष समजण्यांत यावे.

ड. स्वग्राम असलेल्या तालुक्यात बदली/नेमणुक देवु नये.

क्र. २. :– वरील प्रमाणे कालावधीची गणना करतांना बदली वर्षातील ३१ मे पर्यंतचा कालावधी धरण्यांत यावा.

क्र. ३. :– बदलीपात्र अधिकारी/कर्मचारी यांची बदली करण्यापुर्वी त्यांचेकडुन पसंतीची ०३ घटक कार्यालयांची नावे प्राधान्यक्रमाने घेवुन शक्यतो त्या प्रमाणे बदल्या कराव्यात.

२/– उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुशंगाने ज्या पोलीस कर्मचा–यांची दिनांक ३१/०५/२०१९ रोजी किंवा तत्पुर्वी एकाच ठिकाणी ( पोलीस ठाणे ) शाखा खंडीत अथवा अखंडीत ५ वर्षे सेवा पुर्ण झाली/होत आहे. अशा पोलीस कर्मचा–यांच्या सन २०१९ च्या सर्वसाधारण बदल्यांचे वेळी इतरत्र बदल्या करण्यात येणार आहेत.

३/— तरी आपल्या नेमणुकीतील ज्या पोलीस कर्मचा—यांची सध्याची नेमणुकीच्या ठिकाणी खंडीत अथवा अखंडीत ( त्याच पोलीस ठाणे/शाखेतील पुर्वीची सेवा धरून ) ५ वर्षे सेवा व त्याच तालुक्यात १२ वर्षे सेवा पुर्ण झाली आहे किंवा दिनांक ३१/०५/२०१९ पर्यंत होणार आहे. अशा कर्मचा—यांची यादी त्यांचे नेमणुकीच्या तारखेसह या कार्यालयास सादर करावी. सदर बदल्यांचे वेळी पोलीस कर्मचा—यांचे पसंतीचा विचार केला जाणार असल्यास ज्या पोलीस कर्मचा—यांना ऐच्छिक ठिकाणी बदली हवी आहे त्यांचेकडुन खालील मुद्दे नमुद करून सोबतच्या उदाहरणादाखल दिलेल्या विवरणपत्र अ मध्ये माहिती भरून घेऊन बदलीसाठी अर्ज घेऊन ते दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत एकत्रितपणे आपले अभिप्रायासह या कार्यालयास दिलेल्या मुदतीत सादर करावेत.

१) बदलीच्या पसंतीची तीन ठिकाणे

२) बदली त्याच ठिकाणी का हवी आहे ते कारण नमुद करावे.

३) सध्याच्या ठिकाणची नेमणुकीची तारीख सध्या ज्या पोलीस ठाण्यांत नेमणुकीस आहेत ते पोलीस ठाणे ज्या तालुक्यामध्ये आहे त्याच तालुक्यातील दुस—या पोलीस ठाण्यांत यापुर्वी सेवा केली असल्यास त्याचा तपशिल दयावा.

( उदा. अलिबाग/मांडवा/रेवदंडा/पोयनाड/रोहा/नागोठणे/खोपोली/खालापुर/रसायनी इत्यादी )

४) मुळ गांव (रायगड जिल्हयांत असेल तर कोणत्या पोलीस ठाणेचे हद्दीतील ) कोणते व त्या ठिकाणी जंगम मालमत्ता ( घर/जमिन इत्यादी ) आहे काय असल्यास स्वरूप नमुद करावे.

४/— पोलीस कर्मचा—यांच्या बदल्या करते वेळी प्रशासकीय सोय विचारात घेतली जाणार आहे. त्यामुळे ज्या पोलीस कर्मचा—यांनी बदलीसाठी ठिकाणे सुचविली आहेत त्या ठिकाणी प्रशासकीयदृष्टया बदली करणे शक्य असेल तरच विचार केला जाईल.

५/— या परिपत्रकापुर्वी ज्यांनी बदलीसाठी अर्ज केले असतील ते दप्तरी दाखल करण्यांत आले आहेत असे समजावे. तसेच ज्यांच्या बदलीबाबत पुढील सर्वसाधारण बदल्यांचे वेळी विचार करण्यांत येईल असे कळविण्यांत आलेले आहे त्यांनी सुध्दा तसे अर्जात नमुद करून पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

६/— तसेच जे पोलीस कर्मचारी यांचे स्वग्राम असलेल्या तालुक्यातील पोलीस ठाण्यात नेमणुकीस आहेत अशा कर्मचा—यांची वेगळी यादी सादर करावी.

७/— तसेच आपले पोलीस ठाणेकडुन बाहेर कर्तव्यासाठी तैनात/प्रतिनियुक्तीवर आहेत व बाहेरील पोलीस ठाणेकडुन आपले पोलीस ठाणेकडे कर्तव्यासाठी तैनात/प्रतिनियुक्तीवर आहेत त्यांचे नावाची तैनातीच्या तारखेसह स्वतंत्र यादी देण्यांत यावी.

८/— मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व कर्मचा—यांना समज दयावी.

९/— कोणताही पोलीस कर्मचारी एकाच पोलीस ठाण्यांत खंडीत/अखंडीत सेवा धरून ०५ वर्षापेक्षा जास्त तसेच एकाच तालुक्यात १२ वर्षापेक्षा जास्त नेमणुकीस रहाणार नाही याची दक्षता घ्यावी.

( अनिल पारस्कर )
पोलीस अधीक्षक, रायगड—अलिबाग

प्रति,

सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी अलिबाग
राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय अलिबाग
पोलीस निरीक्षक, स्था.गु.अ.शाखा/जि.वि.शा./सुशा/नि.कक्ष/वहातुक शाखा, अलिबाग,
पोलीस उपनिरीक्षक, महिला कक्ष/बीडीडीएस पथक

२/— सदरचे परिपत्रक प्राप्त झाल्याची पोहोच दयावी, तसेच परिपत्रक सतत तीन दिवस हजेरीवर वाचुन दाखवावे व बदल्यांबाबत नेमणुकीतील सर्व कर्मचा—यांना समज दयावी.

प्रत :— सर्व उपविभागीस पोलीस अधिकारी, रायगड—अलिबाग.

## विवरण पत्र 'अ'

दिनांक ३१/५/२०१९ पर्यंत एकाच पोलीस ठाणेत/शाखेत/पोलीस मुख्यालय येथे खंडित-अखंडित ६ वर्षे सेवा पूर्ण झालेली आहे.त्याच्या सर्वसाधारण बदली अर्जाचा नमुना फार्म.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | पुर्वीच्या नेमणूका | | | बदली मागीतल्याचे ठिकाण | बदली मागितल्याचे कारण | प्रभारी अधिकारी यांची शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ६ |
| | | ठिकाण | पासून | पर्यंत | | | |
| १ | पोलीस कर्मचारी यांचे नांव<br><br>भरती दिनांक<br><br>सध्याची नेमणूक ठिकाण व तारीख<br><br>मुळ गांव तालुका व सेवानिवृत्तीची तारीख | | | | १)<br>२)<br>३) | बदलीचे कारण:-<br><br>मला पाहिजे असलेल्या बदली बाबत या अर्जा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडे संदर्भ/विनंती केली नाही. अशी विनंती अन्य कोणाही मार्फत प्राप्त झाल्यास त्याचा माझेशी संबंध नाही व त्याचा विचार करण्यात येवू नये.<br><br>( अर्जदाराची स्वाक्षरी ) | सही/-<br>(प्रभारी अधिकारी नांव)<br>पोलीस ठाणे |

टीप :- प्रभारी अधिकारी यांनी शिफारस करतांना दाखल व पाहुन रवाना असा शेरा नमुद न करता अर्जदार यांनी नमुद केलेले कारण खरे आहे अगर कसे? तसेच कर्मचारी यांची एकंदरीत वर्तणुक कशी आहे याबाबत स्पष्ट अभिप्राय नमुद करावा